जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ६२६ दिनांक - १७/०८/२०२३**

## भारती विद्यापीठ पोलिस स्टेशन पुणे शहर

# घरफोडीच्या दोन गुन्हयांची भारती विद्यापीठ पोलीसांकडुन कौशल्यपूर्ण उकल

दिनांक ०२/०८/२०२३ रोजी फिर्यादी नामे जयश्री मगर वय ४५ रा आंबेगाव पठार पुणे यांचे कोणीतरी अज्ञात इसमाने राहते घराचे कुलुप तोडुन आत प्रवेश करुन कपाटाचे लॉकर मध्ये ठेवलेले १,४५,०००/- रुपये किंमतीचे सोन्याचे दागिणे चोरून नेले म्हणुन भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर ५०६/२०२३, भा.द.वि.कलम ४५४,३८० अन्वये गुन्हा दाखल आहे.

सदर दाखल गुन्हयाच्या तपासामध्ये भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनचे तपास पथक हे वरिष्ठाच्या मार्गदर्शनाखाली तपास करीत असताना घटनास्थळाचे तांत्रीक विश्लेषण, तसेच घटनास्थळापासून ठिकठिकाणच्या कॅमेराची पाहणी करुन सदर गुन्हयाचा कसून तपास करीत असताना पोलीस अमंलदार **महेश बारावकर, निलेश ढमढेरे, चेतन गोरे** यांना गुप्त बातमीदारामार्फतीने सदरचा गुन्हा तीन विधीसंघर्षग्रस्त बालकांनी केला आहे. त्यानुसार त्या तीन बालकांना ताब्यात घेवुन त्यांचेकडुन भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर ५०६/२०२३, भांदवि कलम ४५४,३८० या गुन्हयातील सुमारे ९०,०००/- रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने व भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर ४०४/२०२३, भांदवि कलम ४५४,३८० या गुन्हयातील ३०,०००/- रुपये किंमतीची महागडी घरगुती भांडी हस्तगत करण्यात आली आहे.

तरी विधीसंघर्षीत बालकांकडुन एकुण १,२०,०००/- रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने व महागडी घरगुती भांडी हस्तगत करण्यात आली असुन त्यांचेकडुन भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनकडील दोन घरफोडीचे गुन्हे उघडकीस आले आहे.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेशकुमार, मा.पोलीस सह आयुक्त,पुणे शहर,श्री.संदीप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुकत,पश्चिम प्रादेशीक विभाग पुणे शहर श्री.प्रविणकुमार पाटील, मा.पोलीस उप आयुक्त परिमंडळ २,श्रीमती स्मार्तना पाटील, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग श्री.नारायण शिरगावकर, यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशनकडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.विजय कुंभार, पोलीस निरीक्षक (गुन्हे) विजय पुराणिक, गिरीश दिघावकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल रसाळ, पोलीस उपनिरीक्षक धिरज गुप्ता,वर्षा घोगरे,पोलीस अंमलदार महेश बारावकर,निलेश ढमढेरे,चेतन गोरे,सचिन सरपाले,मंगेश पवार,हर्षल शिंदे,शैलेश साठे,अवधतु जमदाडे,अभिजीत जाधव,निलेश खैरमोडे,धनाजी धोत्रे,सचिन गाडे,आशिष गायकवाड,अभिनय चौधरी,मितेश चोरमोले,राहुल तांबे,विक्रम सावंत यांच्या पथकाने केली आहे.


पुणे शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत
महाराष्ट्र पोलीस
भारती विद्यापीठ पोलीस ठाणे, पुणे
पुणे पोलीस
दुरध्वनी क्रमांक: ०२०-२४३६५१००
भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन
पुणे शहर